चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
२१ सप्टेंबर,२०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# ब्रम्हपुरी पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

दिनांक २१/०९/२०१९ रोजी ब्रम्हपुरी येथील पोलीस पथक पोस्टे परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी वाहनाने तोरगाव खुर्द कडुन ब्रम्हपुरी कडे दारूची वाहतुक करणार आहे. अशा माहितीवरून तोरगाव खुर्द येथे सापळा रचुन संशयावरून एका स्कॉर्पिओ वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये १०० बॉक्स देशी दारू किं. १०,००,०००/—रू चा माल मिळुन आला. सदरचा माल आणि दारूची वाहतुकीकरीता वापरलेली एक महिंद्रा स्कॉर्पिओ वाहन क्र. एमएच २८ व्ही ७७८७ किं. ८,००,०००/—रू असा एकुण १८,००,०००/—रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास आणि आरोपीचा शोध सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर, यांचे मार्गदर्शनात प्रभारी अधिकारी ब्रम्हपुरी पोनि. श्री. प्रमोद मकेश्वर यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी पार पाडली.

————————————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


# पडोली पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## ०३ आरोपीसह १२ लक्ष ०२ हजाराचा मुद्द्‌माल जप्त

दिनांक २१/०९/२०१९ रोजी पडोली येथील पोलीस पथक पोस्टे परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम चारचाकी वाहनाने नागपुर ते चंद्रपुर कडे दारूची वाहतुक करणार आहे. अशा माहितीवरून साखरवाही फाटा येथे सापळा रचुन संशयावरून एका स्वीफ्ट डिझायर आणि एक पीकअप वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता, तीन इसम मिळुन आले. त्यांना वाहनातील मालाबाबत विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता, **स्वीफ्ट डिझायर वाहन क्र. एमएच ३० टी ३३८३** मध्ये १९ बॉक्स देशी दारू किं. १,९०,०००/—रू, आणि वाहन किं. ३,००,०००/—रू चा मुद्द्‌माल, तसेच **पिक अप वाहन क्र.** एमएच २७ बीएक्स १९०२ ची झडती घेतली असता ३० बॉक्स देशी दारू किं. ३,००,०००/—रू आणि वाहन किं. ४,००,०००/—रू, व ४ मोबाईल फोन किं. १२,०००/—रू **असा एकुण १२,०२,०००/—रू** चा मुद्द्‌माल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयात **आरोपी नामे १)** मंगेश भास्कर वडड्‌ रा. यवतमाळ, **२)** परवेश खान लतीफ खान रा. यवतमाळ, **३)** अंकीत दिलीप गजबीये रा. यवतमाळ असा एकुण तीन आरोपीस अटक करण्यात आली असुन पुढिल तपास पडोली पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही डॉ.श्री. महेश्वर रेडड्‌ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर, यांचे मार्गदर्शनात प्रभारी अधिकारी पडोली पोनि. श्री. गायगोले यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन पडोली येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी पार पाडली.

---